अंक [illegible] वा ] [ वर्ष [illegible] वें

# " श्री साईलीला " त्रैमासिक



वार्षिक वर्गणी रु. २-४-०

# श्री साई लीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वैर्ज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २६ ] त्रैमासिक—ज नेवारी, फेब्रुवारी, मार्च १९४९ [ अंक ५ वाँ

## —: संपादकीय :—

शुभ कर्माचे शुभ फल व अशुभ कर्माचे अशुभ फल हें सिद्ध आहे. कोणाही प्राण्याला मनानें अगर शरीरानें दुःख देऊं नये; उलट परोपकारानें दुसऱ्यास आपला ऋणी करून ठेवावें. " अष्टादश पुराणांनां सारं सारं समुद्धतम् । परोपकाराय पुण्याय पापाय परपीडनम् ॥

सांई भक्तांनीं आपण आपले स्वतःचे अनुभव ( श्री सांईविषयीं ) साईलीलेंत छापण्यास पाठवा आणि श्री साईच्या गोड सहवासाचें गोड फळ कसें मिळतें तें आपल्या आतस्वकीयांना दाखवून त्यांना कायमचे ऋणी करून ठेवा व त्यांना साईंची सेवा करण्यास भाग पाडा.

प्रभू रामचंद्राची सेवा श्री मारुतीरायानें केली व जगाला सेवाधर्म शिकवला. दुःखितांचें दुःख हरण करणें, संकटांत सांपडलेल्यास हात देणें व गरीबाला आधार देणें प्रत्येक मानवाच्या हातांत आहे.

भक्ति करणें म्हणजे सेवा करणें. ईश्वर जळीं स्थळीं, इकडे तीकडे चोहींकडे व्यापून उरला आहे, असें जर म्हणतात तर तो प्रत्येक प्राण्याच्या हृदयांत आहेच आहे. तर मग दुसऱ्याची सेवा करणें–मग तो हीन अगर मोठा असो–म्हणजे पर्यायानें ईश्वराचीच सेवा करणें होय.

भक्त कोणाला म्हणतात ? ज्याच्या हृदयांत, दया, क्षमा, शांति नांदत आहे, जो मानाकरितां हपापलेला नाहीं अगर ज्याच्या स्वप्नींसुद्धां दुसऱ्याविषयींचा किंतू ( वाईट इच्छा ) येत नाहीं व जो सतत आपलें सत्कर्म करीत असतो तोच खरा भक्त.

कलियुगांत जो तो मानाकरितां हपापलेला आहे. मोठेपणा, भांडून, कायद्यानें अगर दुसऱ्याची निर्भत्सना करून मिळणार नाहीं, तर लहान होऊनच तो मिळेल. " लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥ "

मनुष्याचा स्वभाव संस्कारासंस्कारानें बनतो, व संस्कार बदलले तर स्वभाव बदलतो, व स्वभाव बदलला तर संस्कार बदलतो. आमची स्वाभाविक वाईट विषयां-कडे प्रवृत्ती होणें ह्याचें कारण हाडींमासीं खिळलेले–मातृदोष, पितृदोष, व भूमीदोष होत. " खाण तशी माती व कूळ तशी संतती."

" राम–लक्ष्मण एकदां सह्याद्रीपर्वत उतरून समुद्रस्नानास जात होते, श्रीमंत दशरथ राजाचे हे पुत्र. वाटेनें जात असतां लक्ष्मणाच्या मनांत एकाएकी असें आलें कीं रामानें राज्य करावें व मी मात्र त्याची सेवा करावी; बरें वनवासांतही मी कंदमुळें आणून रामाला द्यावीं आणि मी मात्र उपोषीत रहावें, हा ज्येष्ठ बंधू म्हणून त्याची व त्याच्या पत्नीची मी सेवा करावी ! लक्ष्मण हा आज्ञाधारक होता त्यानें स्नान करीत असतांच विचार केला कीं, श्री प्रभू रामचंद्राच्या सेवेंत कांहींतरी चूक झाली असेल, म्हणून अशा तऱ्हेची कुभावना माझ्या मनांत आली असावी.

स्नान आटोपल्यावर परत येत असतां तीच भूमि चालूं लागल्याबरोबर लक्ष्मणाच्या मनांत परत तेच विचार घोळूं लागले. प्रभू रामचंद्रानें लक्ष्मणाच्या मनांत काय गोंधळ चालला आहे हें जाणून प्रभू रामचंद्र म्हणाले, ' लक्ष्मणा, ही तांबडी माती फार चांगली आहे. ह्याचा थोडासा नमुना तूं आपले जवळ ठेव. ' लक्ष्मणानें एक पुडी बांधली व ती आपणांकडे ठेवली.

सह्याद्रीपर्वत ओलांडून आल्यावर ज्या ज्या वेळीं ती पुडी लक्ष्मणाचे जवळ राही त्या त्या वेळेस, प्रभू रामचंद्राविषयीं त्याचे मनांत कुकल्पना येत. असें दोनचार दिवस लोटल्यावर ' पाप ' लपवून ठेवण्यापेक्षां उघडें केलें असतां त्याचा जोर कमी होतो म्हणून लक्ष्मणानें आपल्या मनांत अशा तऱ्हेचे विचार येण्याचें कारण काय असावें असें श्री रामचंद्रास विचारलें तेव्हां सर्वसाक्षी प्रभू रामचंद्र म्हणाले, ' हा मातीचा गुण आहे ' ती पुडी फेकून दे म्हणजे झालें. त्याप्रमाणें त्यानें केल्यावर त्याचे सर्व कुवीचार लय पावले. प्रत्यक्ष देवादिकांना सुद्धां जर हे संस्कार टाळतां आले नाहींत तर मनुष्य प्राण्याची कथा काय ?

मनुष्याचें मन हें अन्नापासून झालेलें आहे. ज्या गुणाचें अन्न ( सत्व, रज, तामस ) मनुष्य प्राणी सेवन करतो तसें त्याचें मन बनतें व अन्नाचे संस्कार आपल्या विचारावर पगडा पाडतात.

एक संन्यासी एका श्रीमान् गृहस्थाचे घरीं जेवण्यास गेला. भोजनाचा बेत फार सुंदर होता. चांदीचा पाट, ताट, तांब्या, पळी वगैरे वगैरे; संन्यासी पंचपक्वान्नाच्या भोजनानें तृप्त झाला, व तो पानावरून उठणार इतक्यांत चांदीची पळी चोरून न्यावी अशी इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न झाली, संन्यासी ज्ञानी होता. त्यानें आपल्या मनांत वाईट विचार आल्याबरोबर यजमानास आपण उद्योग काय करतां म्हणून स्पष्ट विचारलें, "तो गृहस्थ म्हणाला वृद्धापकालामुळें सध्यां मी कांहींच करीत नाहीं, परंतु एकदां आपत्काल प्राप्त झाला असतां मी हें सर्व द्रव्य चौर्यकर्मानें संपादन केलेलें आहे. त्या दोषाचें क्षालन व्हावें म्हणूनच मी प्रस्तूत सत्पात्र ब्राह्मणांना अन्नसंतर्पण करीत असतों."

ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुंजीथा मा गृधः कस्यचिद्धनम् ॥

हे सर्व जगत् परमेश्वरानें निर्माण केलें. जें कांहीं दृश्य आहे व अनुभावास येतें, ते सर्व त्यांची कृति आहे. मग मिळेल त्यांत संतुष्ट रहा. दुसऱ्याचा हेवा करून त्याच्या जवळचे लुबाडून घेण्याची इच्छा करूं नका, असें ईशावास्योपनिषत्कार सांगतात.

संतसमागमांत आपल्यावर चांगलेच संस्कार होतील व वाईट संस्कार निघून जातील. मातृदोष, पितृदोष व भूमीदोष निघून जाऊन आपले आचारविचार शुद्ध, सात्विक बनतील. म्हणून साई भक्तांनो आपले अनुभव तसेंच श्री. साईविषयींचे लिखाण त्वरित 'साईलिलेंत' छापण्याकरितां पाठवा आणि सर्व बंधु भगिनींना, संस्कार प्राबल्यानें किंवा स्थलमहात्म्यानें मनोविचारांत फरक कसा पडतो हें दाखवा आणि सत्संगतीचा, शुभकर्माचा व चांगल्या आचरणाचा परिणाम आश्चर्यकारक होतो हें जगाला पटवा.

**संपादक**

---

# साईबाबा कोण ?

ईश्वराची मर्जी संपादन करण्याकरितां ज्या आवडत्या देवाचे आपण नामजप करत असतो, त्या मूर्तीचे जर आपण प्रत्यक्ष अगर मनांत ध्यान केलें व तेथें एकाग्रता साधतां आली तर आपणाला अविनाशी सुख मिळेल; त्याकरितां आपण स्वतःला अंतर्बाह्य पुरुषोत्तम व्हावें लागेल.

स्वतः पुरुषोत्तम बनणें म्हणजे 'श्रवण, मनन व निदिध्यास' ही त्रयी आपण व्यापक अर्थानें अनुसरली पाहिजे. । अनुसरतांना जडते नाते । जीवा शिवा भेटवितें ॥

श्रवण म्हणजे नुसतें कानानें ऐकणें योग्य होणार नाहीं. तर सर्व सृष्टीचें निरीक्षण करणें, मननः—जे निरीक्षिलें त्यापासून

सृष्टींतील परमात्मतत्त्वाशीं तद्रूप–निमग्न होणें. 'श्रवण, मनन, निदिध्यास' याचा एवढा व्यापक अर्थ आहे व जेव्हां काया–वाचा–मनें आपल्याकडून पूर्णपणें अनुसरला जाईल तेव्हांच आपण पुरुषोत्तम होऊं.

निदिध्यास करण्याकरितां सद्गुरु अगर प्रतीमा पाहिजे व शिरडीचे साईबाबा हे स्वतः पुरुषोत्तम आहेत व आपणां प्रत्येकाला पुरुषोत्तम बनविण्यासाठीं त्यांनीं अवतार घेतला आहे. अर्थात् त्यांचेच पाय धरणें व निदिध्यास करणें योग्य होईल.

श्री बाबा हे नाथ पंथी होते व ते आदीनाथ होते व त्यांचा उल्लेख 'श्री राम-मारुती महाराज' (समाधीस्थ) ह्यांच्या चरित्रांत मिळतें.

"महाराजा पुसतां समजलें ! सांई आदिनाथ प्रवर्तले । सांईनीं नाथ संबोधिलें । अवतार नाथ परंपरा ॥ ७९ ॥ महाराज जाण्या आधीं शेरडीस । कांहीं परिचित दर्शनास । सांई शिष्यें आग्रहास । पडून विनवींत महाराजा ॥ ८० ॥ सांईबाबा अंश कोणाचे आपणा नाथ म्हणेल त्याचे । सर्वपरी या गूढाचें । पूर्व सर्व सांगणें ॥ ८१ ॥ महाराज हांसून सांगती । सर्व नाथ परंपरेचें असती । आदिनाथ ते सांई सांप्रति । सांईरूपें प्रकटले ॥ ८२ ॥ आम्ही असों भुजंगनाथ । आमचे सद्गुरू बाळ मुकुंद होत । परी सांईसह ते समान असत । सद्गुरु मूर्ती वंद्य त्या ॥ ८३ ॥ यापरी नाथ मार्गीचा खुलासा । महाराज मुखें ज्ञात झाला खासा । ब्रह्मचर्याकृति भासा । हनुमंत रूप दावित ॥ ८४ ॥ नाथ म्हणावा हनुमंत गणा । सिद्धरूप अंशात्मक जाणा । मार्ग दावावया अज्ञजना । अवतरले हे निश्चित ॥ ८५ ॥ श्री राममारुती अ. ४ था."

तसेंच 'श्री माधव नाथ दीपप्रकाश'

श्री परमहंस शीलनाथ । श्री सद्गुरू सांईनाथ । धुंडिराज पुळसी गजानन शेगावांत । गोपाळदास (नरसिंग महाराज) नाशिकीं ॥ हें पंचायतन नाथांचे (श्री माधवनाथ) परम होते जिव्हाळ्याचे । चाले सूत्र एकमेकांचे । अंतःशक्तिनें ॥ श्री. मा. दी. प्र. अ. २२–१०९–१०

श्री बाबांच्या जन्मवृत्तांतासंबंधी मिळालेली माहितीः—

"मोंगलाईंत पाथरी म्हणून गांव आहे. तेथें एक यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मणास तीन मुलगे होते. वडील मुलगा हाच 'श्री साई !' बाबा पांच वर्षांचे असतां एक 'अवलीया' त्या ब्राह्मणाकडे आला व माझें मला दे' म्हणून म्हणाला. त्यावर 'आहे तें तुमचेंच आहे' असें बाबांच्या वडिलांनीं सांगितलें. तेव्हां 'तुझा वडील मुलगा मला दे' असें म्हणून तो अवलीया बाबांना घेऊन गेला. बाबांच्या नवव्या वर्षी परत त्यांना त्यांच्या वडिलांकडे घेऊन तो आला व त्याचे हस्ते दूध घेऊन परत बाबांना तीन वर्षें कोठें घेऊन गेला. वयाच्या १२ ते १८ पर्यंत बाबा अज्ञातवासांत होते. व '१९' व्या वर्षी शिरडींत निंबाच्या झाडाखालीं प्रकट झाले. त्यांची मुंज झालेली नव्हती." दाभोळकर कृत साईसच्चरित्रांत श्री बाबांच्या उक्तींतच ही माहिती सुसंगत असल्याचे प्रत्ययास येते. अर्थात् बाबा हे हिंदू होते हे सिद्ध झालें. त्यांची मुंज झाली नव्हती म्हणून त्यांच्या

गळयांत यज्ञोपवीत नव्हतें, तरी हिंदुधर्माप्रमाणें त्यांचे कान टोंचलेले होते. मोंगलाईंत जन्म झाल्यामुळें यवनी भाषा, वेष व आचार इत्यादीचा बोध होतो.

ब्रह्म जानाति इति ब्राह्मणः । बाबा स्वतः ज्ञानी होते व त्रिगुणातीत होते. बाबांचा त्रिगुण देहधारी हा नाटकी वेष होता. ते वासनाबंधनयुक्त जन्मास आलेले नाहींत, तर वासना खंडून ज्ञानी अवस्थेंत उदयाला आले. श्रीकृष्ण परमात्म्यांची मुंज झाली नव्हती व त्यांनीं सांदिपनी गुरु केला, तसेंच बाबांचीहि मुंज झाली नव्हती व त्यांनीं व्यंकुसहा गुरु केला, हे उभयतांतील साम्य भक्तांनीं लक्षांत घ्यावें.

" हिंदू म्हणावे जरी तयास । मशिदींत सदा निवास ॥
यवन म्हणावे तरी हुताश । अहर्निश मशिदीं ॥
मशिदींत जात्याचे दळण । मशीदींत घंटाशंख वादन ॥
मशीदींत अग्निसंतर्पण । मुसलमान कैसे हें ॥
मशीदींत सदैव भजन । मशीदींत अन्नसंतर्पण ॥
मशीदींत अर्घ्य पाद्य पूजन । मुसलमान कैसे हे ॥ दा. सां. स. ७.

ह्यावरून बाबा स्वतः हिंदू होते व स्वतः पुरुषोत्तम झालेले असल्यामुळें जातीपातीचा अगर कसलाही भेदभाव त्यांच्यापाशीं शिल्लक राहिलेला नव्हता.

आमचा देव निराकार असून, तो पुन्हा निर्गुण आहे शिवाय तो " अणुरणीयान महतो महीयान " असा आहे. श्रीकृष्ण भगवान म्हणतात—मी सर्वत्र आहे. व हृदयाचे ठिकाणीं वास करीत असतों. पण देव व मोठमोठे ऋषीसुद्धां मी कसा प्रकट झालों आहे ते जाणत नाहींत. कारण मी परमेश्वर देव व ऋषी यांचें आदिकरण आहे. ( गीता १०–२ ) तरी पण लोकांना विसर पडूं नये म्हणून सर्व भूतांच्या अंतरीं असणारा आत्मा मी, सर्व भूतांचा आदि मी, मध्य मी, व अंतही मी, सूर्य मी, चंद्र मी, वेद मी, इंद्र मी, मन मी, शंकर मी, पावक मी, बृहस्पती मी, भृगु मी, ऐरावत मी, कामधेनु मी, अशा कितीतरी आपल्या विभूति भगवंतांनीं गीतेच्या १० व्या अध्यायांत सांगितल्या आहेत. शेवटीं जो जो पदार्थ ऐश्वर्यवान किंवा तेजस्वी असेल तो तो माझ्या तेजाच्या अंशापासून उत्पन्न झाला आहे असें समज. हेतू हा कीं 'मी ईश्वरच' सर्वत्र भरलेला आहे त्याचा हिंदु जन्माला विसर पडूं नये.

परंतु मोहमायेच्या रज्जूनें ह्या देहांत हृदयग्रंथी पुष्कळ बांधलेल्या आहेत, त्यांचा जोपर्यंत लय झाला नाहीं. ( फुटल्या नाहींत ) तोपर्यंत ( मी ) पुरुषोत्तम कसा ओळखूं?

देहादिकांच्या ठिकाणीं आत्मत्व असल्याचा निश्चय होणें ही पहिली मुख्य ग्रंथी कीं ज्याच्या योगानें हा संसार एवढा अवाढव्य व अनिवार झाला आहे, 'केवळ भासमात्मक जगाच्या ठिकाणीं आत्मा नाहीं असा होणें दुसरी ग्रंथी. जीव व ईश्वर निराळे निराळे भासणें, वगैरे ग्रंथींनें युक्त असा हा पुरुष बद्ध झाला आहे त्या ग्रंथी उलगडल्या म्हणजे बंधापासून मुक्ति होते.

बाबा वदती मृदु वचन । आभाळ आलें आहे जाण
पडेल पाऊस पीकपीकोन । आभाळ वितळून जाईल ।

एकदां शिरडी गांवांत ग्रंथीज्वर आला. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या लहान मुलास ताप भरला. त्यांची आई घाबरून गेली व घरीं जाण्याची परवानगी मागण्यास बाबांकडे आली, बाबांनीं तिला धीर देऊन न भिण्यास सांगितलें व आपली कफनी कंबरे-पर्यंत वर करून दाखविली. तो बाबांच्या दोन्ही जागेंत चार गांठी टवटवून उठलेल्या दिसल्या—असो.

स्पेसीफिक प्लेग बॅसिलाय आपल्या रक्तांत शिरल्यामुळें आपणांस ग्रंथीज्वर ( Bubonic Plauge ) होतो. ह्या तापांत भ्रम होतो व शेवटीं अंत होतो; तसेंच भवताप, भवभ्रम यांचे अदिकरण अज्ञान ग्रंथी होत व त्याच आपला नाश करतात. ग्रंथीज्वरांत मनुष्य मरतो म्हणजे जडदेह नाहींसा होतो.

भवग्रंथी ज्वरांत जीवात्मा मेलेला असतो म्हणजे देहाहंकारानें जन्ममरण पाशात गुंततो व स्व-रूपाला विसरतो.

बाबांनीं आभाळाच्या दृष्टांतानें हेंच दाखविले आहे. आकाश—ह्या शब्दाचा अर्थ जागा, पोकळी जसें बाहेर नील—छत्र—गगन दिसते त्याला आकाश म्हणतात. घटाकाश, मठाकाश—घट व त्यांतील जागा, घटाकाश, मठ म्हणजे घर त्यानें व्यापलेली जी जागा ती मठाकाश व सर्व चराचर व्यापून टाकणारी जागा ती चिदाकाश.

आकाशांतून सर्व चराचर भासमान झालें; आकाशांतच तें स्थिरावलें व आकाशांतच ते लय पावले; पण हें आपणांस आपला मायभ्रम—संकुचीत दृष्टी—निरसेल तेव्हा कळेल; मायाभ्रम हेंच तें आभाळ.

व्यवहारांत आपण आभाळ आलें त्यानें आकाश व्यापून टाकलें, असें म्हणतो, लगेच पाऊस पडतो व आभाळ वितळतें व परत जसेच्या तसेंच निळे आभाळ दिसतें. आभाळ एकदेशीय येते पण आपल्या संकोचीत दृष्टीला सर्व आकाश व्यापलेलें दिसतें. तद्वतच मायेच्या आवरणामुळें व्यक्ती, धर्म, देव निरनिराळे भासतात, हाच भवताप,—भवभ्रम—अज्ञान ग्रंथीज्वर.

' भिती किमर्थ ऐसें वदून । कफनी कंबरेपर्यंत उचलून ॥
दाविते झाले सकळा लागून । ग्रंथी टवटवून उठलेल्या ॥

हें मायेचें आवरण—भ्रम दूर झालें, कफनी वर केली कीं एकमेव साईपरमात्म्याच्या अंगावर ह्या सर्व अज्ञान ग्रंथी खेळतात हें आपल्यास पटवून दिलें—अज्ञान ग्रंथी फुटतात, आभाळ ओसरते आणि आपला भवताप जाऊन जिवात्मा चित्तत्वांत समरसून चिरंजीव होतो.

व्यवहारांत 'मी' 'माझे' इत्यादि 'आपले'पणांनीं सर्वांस इतकें मोहिले आहे कीं आपला समदृष्टिकोन जन्मोजन्मी होणें मुष्कील आहे. आणि म्हणूनच आध्यात्मांत

सोप्यांत सोपा असा भक्ति मार्ग सांगितला आहे. भक्ति म्हणजे आदर प्रेम. एकाद्याविषयीं आपल्याला आदर, प्रेम केव्हां वाटतें ! जेव्हां तो आपल्याविषयीं आपुलकी दाखवितो तेव्हांच, आणि बाबांनी हेंच तत्त्व आपणांस शिकविलें आहे.

म्हणूनी पहा हें भोगणें पडे ।
तुमचे सांकडे मजलागी ॥

बाबांनी श्री खापर्ड्यांच्या मुलाचें दुखणें स्वतः घेतले पण केव्हां

' बाई जाऊनी पाय धरी ।
निवेदन करी घडलें जे ॥

श्रीकृष्णानें द्रौपदीची लाज राखली पण केव्हां ज्या वेळेस तिनें श्रीकृष्णाचा कळकळीनें प्रेमानें धांवा केला तेव्हां. प्रारब्धांत जरी घडणें असेल तरी आपला भाव–आपली भक्ति. आपलें प्रेम जर ईश्वरावर–साईवर असेल तर तो प्रारब्धभोग सौम्य करून दिशा बद लकतो एवढें खरें. प्रारब्धभोगाप्रमाणें खापर्ड्यांचा मुलगा ग्रंथीज्वरानें सीक झाला पण साईकृपेनें तो वांचला व त्याचें तें भोगणें बाबांनीं स्वतः घेतलें. जो देवाला विसरत नाहीं त्याला देवही विसरत नाहीं हें तत्त्व बाबांनीं कृतीनें स्पष्ट करून दाखविलें.

देवाला देवत्व दिल्याशिवाय व आपल्या मनांत देवाची स्थापना, कल्पना, भावना असल्याशिवाय देव देवत्वाला पावत नाहीं. बाजारांत देवांच्या मूर्ति पुष्कळ विकण्याकरितां ठेवलेल्या असतात. अगर गणेश चतुर्थीच्या दिवशीं शेंकडों गणपती बाजारांत विकण्याकरितां मांडतात परंतु तेथें त्याची पूजा अगर नमस्कार करीत नाहीं तर त्यांतील एक मूर्ति वाजत गाजत घरी आणून तिला सिंहासनावर बसवून ब्राह्मणांकडून तिची प्राणप्रतिष्ठा करितात म्हणजे तिला भावनापूर्वक देव गजानन मानून भजतात, अर्थात् देव आपल्या भावनेंत, श्रद्धेंत आहे.

देवळांत किंवा भावनेंत–मनांत–मनोभावनेंत कोठेंहि ईश्वरी भावना ठेवण्याला दगड, धातू, वृक्ष कांहींतरी प्रतीक असावें लागतें. निराकारात ती (भावना) सुलभतेनें राहूं शकत नाहीं. जसें स्त्री म्हटली म्हणजे स्त्रीची मूर्ति मनांत उभी रहाते तद्वत देव म्हटला कीं देवाची प्रतीमा चटदिशीं लक्षांत येते.

साईभक्तांनीं श्री सद्गुरु साईबाबा हे पुरुषोत्तम आहेत व त्यांची मूर्तिध्यानांत ठेवून त्यांचेंच चिंतन करीत रहावें. सद्गुरु साईबाबा हे परब्रह्म पुरुषोत्तम आहेत.

भक्तांनी करीतां न यत्न अगदीं देईल जो उन्नती ।
देवासी घडवील भेट गुरुसी लोकां हवा सांप्रतीं ॥
चित्तीं हेतू विकल्प दुष्ट असतां भेटे जरी सद्गुरु ।
नेती खालींच दुष्ट हेतु गुरुला येई कसें उद्धरुं ॥

सर्व साई भक्तांनो वरील श्लोकाचा अर्थ ध्यानीं आणा, व ह्या कलियुगांत आपलें आद्य कर्तव्य करा.

—संपादक

# —: श्री सद्गुरु साईनाथ :—

: श्रीदत्तचित्साइसद्गुरु भ्योनमः

शिरडी येथील नेहमीं निवास करीत असलेल्या मशिदीला बाबा द्वारकामाई कां म्हणत याबद्दलचें संशोधनः—

पुराणवस्तु संशोधन प्रियविषय—विद्वान पंडितांना वरील संशोधन खात्रीनें अत्यंत महत्त्वाचें व अप्रतिम मोलाचें वाटेल. इतरांस तें फोल, नीरस व रुक्षही वाटेल. पण त्याला कोणाचा इलाज नाहीं. तथापि कसेंहि असलें, तरी या संशोधनानें बाबांच्या भक्तजनांना, बाबांच्या अतिमर्त्य, अतिमानुष, अतिपौरुष ज्ञानाचें निःसंशय साश्चर्य व सानंद कुतूहल व समाधान वाटेल.

कोणतेंही संशोधन लोकादराला पात्र होण्यास माझ्या अल्प समजुतीप्रमाणें तें, भूगर्भशास्त्र, इतिहास,—पुराण, संतवचन व प्रतीति या तीन किंवा चार कसोट्यांना उतरलें पाहिजे. आतां वरील संशोधन या सर्व कसोट्यांना उतरलें, तर तें सितोपला व पय यांच्या सुंदर संमिश्रणाप्रमाणें अमृततुल्य गोड, मधुर, स्वादिष्ट व रुचकर होईल यांत शंका नाहीं.

वरील कसोट्यांपैकीं या संशोधनाला तूर्त तरी संतवचन, पुराण, निसर्ग व अल्पप्रतीति याच कसोट्यांचा मुख्य आधार आहे. तो खालीं लिहिल्याप्रमाणें तोंडी व लेखी आहे. सहृदय व तज्ञ वाचकवृंदानीं व प्रेमी भक्तजनांनीं याचा निःपक्षपातबुद्धीनें पूर्ण विचार करून आपले मनोगत प्रकट करावेत व ज्यांना यासंबंधीं जास्त माहिती असेल, ती त्यांनीं कृपेनें प्रसिद्ध करावी, अशी नम्र व सविनय प्रार्थना आहे.

बाबा शिरडींत आल्यापासून समाधिकालापर्यंत क्वचित् प्रसंग खेरीज करून, ज्या मशिदींत अखंड निवास करीत, त्या मशिदीला ते कधीं द्वारका, कधीं द्वारकामाई, कधीं द्वारकामाता, व कधीं द्वारावती या नांवानें संबोधित. ही गोष्ट शिरडींत रहात असलेल्या कै. श्री. माधवराव बळवंत देशपांडे, कै. तात्याजी गणपत पाटील कोते, कै. बाळोबा काशिराम शिंपी, कै. बयाजी पाटील कोते, कै. रघूजी पाटील शिंदे, व कै. रघुवीर भास्कर पुरंदरे आदि करून पुष्कळ भक्तजनांनीं अनेक वेळां ऐकिली आहे. कै. भक्तश्रेष्ठ श्री. गोविंद रघुनाथ उर्फ अण्णासाहेब दाभोळकर यांनीं, या द्वारकामाईचें सामर्थ्य, वैभव व योग्यता बाबांनीं स्वतः ज्या एका प्रसंगीं वर्णन करून त्याची प्रत्यक्ष प्रतीति कै. भक्तवर्य श्री. बाबासाहेब मिरीकर यांना व माधवराव देशपांडे यांना दाखविली त्या लीलेचें वर्णन, आपल्या श्रीसाईसच्चरिताच्या बाविसाव्या अध्यायांत सविस्तरपणें केलें आहे. तेंच मी खालीं या गोष्टीचा पुरावा म्हणून जसेंच्या तसें देत आहें. बाळासाहेब मिरीकर त्यावेळीं कोपरगांवचे मामलेदार असून त्यांचा मुक्काम चितळी स्टेशनजवळील श्रीमारुतीच्या देवालयांत होता. तेथून शिरडी नजीक असल्यामुळें ते बाबांच्या दर्शनाकरितां त्या दिवशीं आले होते. दर्शन झाल्यावर परत जाण्यास बाबांची त्यांनीं आज्ञा मागितली. जा, पण शाम्याला

बरोबर घेऊन जा, असें बाबा म्हणाले. त्याप्रमाणें बाळासाहेब माधवरावास बरोबर घेऊन गेले.

बाळासाहेब बाबांच्या जवळ बसले असतांना बाबांनीं त्यांना द्वारकामाईची अद्भुत शक्ति व पुढें त्याच दिवशीं रात्रीं होणारें भविष्य स्वमुखानें कथन केलें. तें असें:—

" बाबा मिरीकरास ते ठायीं । पुसती प्रश्न नवलाई ॥
अहो ती आपली द्वारकामाई । आहे कां ठावी तुम्हांतें ॥ ४५ ॥
बाळासाहेबास हा कांहीं । मुळींच उलगडा झाला नाहीं ॥
तंव बाबा वदती आतां पाही । द्वारकामाई ती हीच ॥ ४६ ॥
हीच आपली द्वारका–माता । मशिदीचे या अंकीं बैसतां ॥
लेंकुरा देई ती निर्भयता । चिंतेची वार्ता नुरेची ॥ ४७ ॥
मोठी कृपाळू ही मशीदमाई । भोळ्या भाविकांची ही आई ॥
कोणी कसाही पडो अपायीं । करील ही ठायींच रक्षण ॥ ४८ ॥
एकदां हिचेअंकीं जो बैसला । बेडा तयाचा पार पडला ॥
साउलींत हिचे जो पहुडला । तो आरुढला सुखासनीं ॥ ४९ ॥
हीच द्वारका, द्वारावती । बाबा मग तयास देती विभूति ॥
अभयहस्त शिरीं ठेविती । जावया निघती मिरीकर ॥ ५० ॥
आणीक वाटलें बाबांचे जीवा । मिरीकरातें प्रश्न पुसावा ॥
ठावा कां तुज लांब–२बुवा । आणीक नवलावा तयाचा ॥ ५१ ॥
मग मूठ वाळूनि डावा हात । कोंपरांशीं उजवे हातांत ।
धरुनि फिरवीत, मुखें वदत । ऐसा भयंकर असतो तो ॥ ५२ ॥
परी तो काय करतो आपलें । आपण द्वारकामाईचीं पिलें ॥
कोणा न उमगे तिचें केलें३ । कौतुक ४उगलें पहावें ॥ ५३ ॥
द्वारकामाई असतां तारिती । लांब बाबा काय मारिती ॥
तारिल्यापुढें मारिल्याची गती ? ती काय किती समजावी ॥ ५४ ॥

— श्रीसाईसच्चरित अध्याय २२

१ जन्ममृत्युचें संकट, २ साप, ३ करणें, सामर्थ्य प्रभाव शक्ति ४ उगीच.

बाबांच्या मुखांतले वरील शब्द मींही ऐकिले असतील. पण मला ते पूर्णपणें स्मरत नाहींत. मी बाबांच्या पुण्यनगरींत सन १९१० पासून जाऊं लागलों. पण माझा मुक्काम तेथें वर्षाकाठीं ७ किंवा ८ दिवसांपेक्षां केव्हांही जास्त नसे. कै. बाळासाहेब यांची गोष्ट मात्र मी श्री. माधवराव देशपांडे यांचे तोंडून बाबांचे ह्यातींत व बाबा समाधिस्त झाल्यावर पुष्कळ वेळां ऐकली आहे.

यात्रेकरितां म्हणून मी सन १९२५ च्या डिसेंबर महिन्यांत प्रथम श्री द्वारका क्षेत्रीं गेलों. पण तेव्हां द्वारकासंशोधनाची गोष्ट माझ्या मनाला मुळींच शिवली नव्हती.

सन १९३० च्या आक्टोबर महिन्यांत श्री–साईसच्चरिताचा ५३ वा अवतारणिकाध्याय तयार करण्याकरितां मी जेव्हां इतर सर्व अध्यायांबरोबर २२ वा अध्याय मनन करून वाचूं लागलों, तेव्हां बाबा शिरडींत ते बसत असलेल्या मशिदीला द्वारका कां म्हणत, याबद्दल विचारतरंग मनांत घोळूं लागले, व आजपर्यंत बुद्धिमान्, विद्वान, कल्पक अशा बाबांच्या चाणाक्ष भक्तगणांच्या विचारपथांत हें अत्यंत महत्त्वाचें संशोधन कसें आले नाहीं याचें कारण न उमगल्यामुळें बरीचशी खिन्नता व निराशा वाटूं लागली. पुराणवस्तुसंशोधन हा माझा विषय नसल्यामुळें वरील गोष्टींचें संशोधन कसें करावें हें मला समजेना. जरी माझा हा विषय नाहीं, तरी पूर्वीपासून मला या गोष्टींचा नाद तर खराच.

चि. जानकीबाई जठार एल. सी. पी. एस. लेडी डॉक्टर जामनगर (माझ्या कन्या) यांना भेटण्याकरितां मी सहकुटुंब सन १९३२ सालांत जामनगरला गेलों, व तेथून श्रीकृष्ण परमात्म्यांची पुण्यनगरी नजीक असल्यामुळें मी पुन्हां द्वारकाधीशाच्या दर्शनाकरितां द्वारकेला गेलों. बाबांच्या वचनसंशोधनाला प्रारंभ कोणत्या दिशेनें व कोणाजवळ व कसा करावा हेंच मला निश्चित कळेना. पंडे लोकांत तपास केला. श्रीद्वारका महात्म्य वाचलें. पण कांहींच मागमूस लागेना. मी परत आलों.

श्रीकृष्णपरमात्मा निजधामाला गेले, तेव्हां त्यांनीं मूळ द्वारका–सोन्याची द्वारका समुद्रांत बुडविली, व कांहीं कालानें कलियुगाच्या प्रारंभीं निष्ठावंत, प्रेमी व ज्ञानवान अशा कांहीं ऋषिमंडळीच्या प्रेमाग्रहावरून व विनंतीवरून परमात्म्यांनीं समुद्रापासून पुन्हां जागा मागून घेऊन त्या जागेवर विश्वकर्म्याकडून दुसरी द्वारका बनवून घेतली, व हल्लीं जी आपण पाहतों तीच दुसरी द्वारका, असें श्रीमद्भागवतांतील कांहीं कथाभागावरून दिसतें.

मूळ द्वारका कोठें होती हें हल्लीं उपलब्ध असलेल्या कोणत्याही ग्रंथावरून खात्रीशीरपणें कळून येत नाहीं; तेव्हां बाबांच्या वचनाप्रमाणें ती पूर्वी नगर जिल्हा ज्या भूभागांत आहे तेथेंही असूं शकेल. त्यांतील कृष्णपरमात्म्याचें मंदिर ( राजवाडा ) हल्लीं नगर जिल्ह्याच्या ज्या भूभागांत शिरडी गांव आहे, तेथेंहि असूं शकेल, व त्या मंदिरांतील कृष्ण परमात्म्याची खास बसण्याची जागा शिरडींतील बाबा बसत असलेल्या मशीद–भूभागांत असूं शकेल व निजावयाची जागा, एका दिवसाआड ज्या चावडींत बाबा निजावयास जात असत, तीहि असूं शकेल.

पण या सर्व कल्पना आहेत. तर्कसुद्धां नव्हेत. आतां बाबांच्या वचनाप्रमाणें कोणत्यातरी काळीं मूळ द्वारका तेथें होती असें मानलें, तर ज्या अर्थी परमात्मा निजधामास जाण्यापूर्वी त्यांनीं ती समुद्रांत बुडविली असें पुराणांतरीं वर्णन आहे, त्याअर्थी ती कोठेंतरी समुद्रभागाजवळच होती हें निश्चित. नगर जिल्हा महाराष्ट्रांत आहे. तेव्हां मूळ द्वारका जर समुद्रांत असेल तर महाराष्ट्र हा केव्हांतरी एका काळीं समुद्रांत किंवा जलमय असला पाहिजे असें अनुमान सहाजिक निघतें. बाबांचीं मुखाक्षरें सदैव सत्य व अमोघ. तीं अन्यथा कधींही होणार नाहींत ही बालंबाल खात्री. पण महाराष्ट्रांत दर्या

कोठून येणार ? दर्या ( पश्चिम समुद्र, अरबी समुद्र ) व महाराष्ट्र यांच्या दरम्यान निसर्गानें दक्षिणोत्तर असंख्य वर्षापूर्वीपासून मानदंडाप्रमाणें एक अवाढव्य, अभेद्य व अजस्र असा उन्नतोन्नत सह्य पर्वत उभा करून ठेविला आहे. हा पश्चिम समुद्र व महाराष्ट्र यांत कमीत कमी तरी १७५ ते २०० मैलांचें अंतर आहे. तेव्हां बाबांच्या वचनाला मेळ बसावा कसा, असें वाटून माझ्या वृत्तीला पुनरपि साशंकतेनें, निराशेनें व उदासीनतेनें ग्रासलें.

पण या शंकेचें पुढें थोड्याच कालांत अल्पसें निराकरण होऊन माझे आशेचे किरण निराशेच्या व उदासीनतेच्या काळ्याकुट्ट ढगांतून थोडेथोडे बाहेर डोकावूं लागले.

श्रीनर्मदा खोरें संशोधनमंडळाचे प्रशस्य सचिव (ऑनररी सेक्रेटरी) धर्मवीर कै. विष्णु रघुनाथ उर्फ बापूसाहेब करंदीकर, सातारा, यांचा पूर्वी महाराष्ट्रांत गोड्या पाण्याचा समुद्र होता अशा आशयाचा, हिंदुस्थानची अतिप्राचीनकालची अमोल इतिहाससंपत्ति जीं पुराणें, त्यावर आधारलेला लेख ता. १७ ऑगष्ट १९३४ चे केसरी-पत्रांत प्रसिद्ध झाला. हा लेख मी कै. भूगर्भशास्त्रज्ञ श्री. रामचंद्र आत्माराम उर्फ बाबासाहेब तर्खड यांच्या नजरेला आणला. या लेखावरून पूर्वी केव्हांतरी महाराष्ट्रांतील नगर जिल्ह्यांत बाबांच्या वचनाप्रमाणें द्वारका असावी या माझ्या अनुमानास बाबासाहेबांनीं बरीचशी पुष्टी दिली. त्यामुळें या कामीं जास्त शोध करण्यास मला बराच हुरूप व उमेद आली. बाबासाहेबांचा ता. ११-४-३६ रोजीं टाइम्स ऑफ इंडियांत " Ahmednagar District Research " या शीर्षकाखालीं प्रसिद्ध झालेला इंग्रजी लेख पहा.

नंतर याच वर्षांत म्हणजे सन १९३४ सालांत श्रीमती विदुषी काशीबाई कानिटकर, पुणे, यांनीं त्यांचे बाबांच्या संबंधाचे सन १९०९ ते १९१३ च्या दरम्यानचे आपल्याला आलेले आठ अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां बाबासाहेब तर्खड यांच्याकडे पाठविले. त्याप्रमाणें ते अनुभव श्रीसाईलीला वर्ष ११ जोड अंक २-३-४ यांतील पान ७३ ते ८० वर प्रसिद्ध झाले. ते मी काळजीपूर्वक वाचले. त्यांपैकीं नंबर ६ व नंबर ८ हे संशोधनार्ह आहेत असें वाटून नंबर ६ च्या अनुभवांतील लीलेच्या संशोधनार्थ सामग्री गोळा करूं लागलों. इतक्यांत श्री. रा. वासुदेव अनंत बांबर्डेकर, वांद्रें, यांनीं त्याच अनुभवासंबंधानें बाबासाहेब तर्खड यांना लिहिलेलें. ता. २८-९-३४ चें पत्र बाबासाहेबांनीं मजकडे पाठविलें; यांत मीं तें संशोधनकार्य हातीं घ्यावें अशी रावबहादुरांची सूचना होती. यावरून (मला एकप्रकारचें प्रोत्साहन मिळून मी माझ्या अल्प समजुतीप्रमाणें व जमविलेल्या सामग्रीप्रमाणें त्या संशोधनाला लागलों व त्यासंबंधानें मला जी प्रत्यक्ष तोंडी व लेखी माहिती मिळाली, ती मी) " बाबा हिंदु कीं मुसलमान व श्री. सखाराम महाराज कवाडकर हे बाबांचे गुरुबंधु होते कीं काय ? असल्यास कसे ? " या शीर्षकाखालीं श्रीसाईलीला मासिक वर्ष १२ जोड अंक १-२ यांत प्रसिद्ध केली. ती जरी अपुरी आहे, तरी त्यांतील अल्पसंशोधनामुळें श्रीमती विदुषी काशीबाई कानिटकर

यांच्या नंबर ८ मध्यें लिहिलेल्या “( छातीला हात लावून रागाच्या आवेशांत मजकडे तोंड करून जोत्यावर उभे राहून ) हा ब्राह्मण आहे. शुभ्र ब्राह्मण आहे. काळ्या वस्तूचा ह्याला संबंध नाहीं. हा शुभ्र ब्राह्मण. (मुसलमान येथें पाय काय ठेवील ? त्याची बिशाद काय येथें येण्याची ? हा ब्राह्मण) ( छातीला हात लावून ) लाखो जणांना शुभ्र मार्गावर लावून पोंचविणारा आहे. शेवटपर्यंत पोंचविणारा. आहे. ही ब्राह्मणाची मशीद आहे. ह्या मशिदीवर काळ्या मुसलमानाची साउली सुद्धां पडूं देणार नाहीं.” अनुभवांतील बाबांच्या वरील मुखोद्‌गाराकडे व ही मशीद द्वारकामाई आहे ह्या त्यांच्या वचनाकडे साहजिक रीत्या पण प्रामुख्यानें माझें लक्ष खेंचलें गेलें, व ज्या अर्थी बाबा छातीला हात लावून ही मशीद ब्राह्मणाची आहे, ही काळ्या मुसलमानाची नाहीं, व ही द्वारकामाई आहे असें वारंवार म्हणतात त्या अर्थी समुद्रांत बुडविलेली मूळ द्वारका तरी एके काळीं येथें असली पाहिजे किंवा हल्लींची द्वारका निर्माण होण्यापूर्वी किंवा निर्माण झाल्यानंतर पुढें केव्हां तरी श्रीकृष्ण परमात्म्यांनीं कांहीं तरी कारणाकरितां या भागांत दुसरी एखादी द्वारका निर्माण केली असावी असें मनांत येऊं लागलें ! परंतु हीं निव्वळ अनुमानें आहेत; ह्यांना सिद्धांत स्वरूप येण्यास भूगर्भशास्त्र, इतिहास किंवा पुराणें यांचा आधार पाहिजे व तो आपल्या-जवळ मुळींच नाहीं. म्हणून पुनरपि आशेचे किरणांकुर सुकून व करपून जातात कीं काय अशी भीति वाटूं लागली. तथापि बाबांच्या वचनावर पूर्ण निष्ठा, भरंवसा व श्रद्धा ठेवून सबुरी धरून उद्योगाला लागावें अशी जोराची प्रेरणा झाली. तरी पण हा उद्योग म्हणजे सुकाणूवांचून दर्यांत टाकलेल्या होडग्याप्रमाणें आहे असें वाटे.

असो. मी पुन्हां मुलीला भेटण्याकरितां जामनगरास गेलों; तसाच तेथून सन १९३५ च्या फेब्रुवारी महिन्यांत पुन्हां तिसरे वेळीं श्री द्वारकधिशाचे दर्शनाकरतां द्वारकेस गेलों. पुन्हां पंडे लोकांत व इतर लोकांत तपास केला, व श्रीद्वारकामहात्माचा पुन्हां काळजीपूर्वक अभ्यास केला. पण संशोधन कार्यास त्यापासून कांहीं उपयोग झाला नाहीं. परत आलों.

त्याच वर्षी म्हणजे सन १९३५ सालीं जून महिन्यांत ता. २० रोजीं द्वारकेच्या अलीकडे ५–६ स्टेशनें खंबालिया म्हणून जामनगर द्वारका ( जे. डी. ) रल्वेवर एक मोठा गांव आहे. तेथें मुलीला भेटण्याकरितां गेलों, व तेथें या संशोधनानिमित्त एक महिनाभर मुक्काम केला. खंबालियाचे प्रांत ऑफिसर श्री. पथुभा खेंगारजी भाईसाहेब, तेथील हायस्कूलचे हेडमास्तर श्री. प्रतापराय रेदाणीसाहेब व रेल्वे इंजिनियर श्री. बक्षीसाहेब यांच्या गांठी घेतल्या. त्यांनीं मला या कामीं फार मदत केली व कामाची दिशा दाखविली. त्यांच्याच सांगण्यावरून नंतर मी तेथूनच दुसऱ्या दिवशीं चवथ्या वेळीं द्वारकेस जाऊन द्वारकेचे रहिवासी श्री. कल्याणराय नथूभाई जोशी बी. ए, हेडमास्तर विसनगर यांची गांठ घेतली. हे वैष्णव औदिच ब्राह्मण असून ह्यांचें वय अजमासें ४५–५० वर्षांचें आहे. ह्यांचा ऐच्छिक विषय शास्त्र–Science. पण ह्यांना संशोधनाचा नाद फार. व ह्यांचें संशोधन म्हणजे मूळ द्वारका कोठें होती हेंच. हे आज

१५–२० वर्षें हेंच कार्य करीत आहेत. मूळ द्वारकेसंबंधानें त्यांचीं तीन अनुमानें आहेत. ( व हीं बहुधा श्रीस्कंद पुराणांतील प्रल्हादसंहितेंतील द्वारका महात्माचा अध्याय २७ च्या आधारें काढिलेलीं दिसतात. ) पहिलें, मूळ द्वारका ही हल्लींची जी द्वारका आहे, तेथेंच पूर्वी असावी. दुसरें, ती हल्लीं द्वारकेपासून २०–२५ मैलांवर असलेल्या ओखा बंदरावर असावी. तिसरें, गिरनार पर्वताजवळ जो रैवत पर्वत आहे, तेथें असावी. श्री. कल्याणराय यांचें, हल्लीं श्रीमंत बडोदेसरकारच्या परवानगीनें व आश्रयानें हल्लींच्या श्रीद्वारकाधीशाचे मंदिरामागेंच उत्खननाचें काम चालू आहे. त्यांनीं या संशोधनासंबंधीं इंग्रजींत एक निबंध लिहिला असून त्यांत त्यांनीं पूर्वी इतर दुसऱ्या गोष्टीबरोबर यादव वंशापैकीं क्षत्रप कुलांतील उपवदत्त राजाचें राज्य अहमदनगर जिल्ह्याच्या बाजूला होतें व त्याच्या मुलीवरून त्याचा व द्वारकेचा संबंध होता, असें दाखविलें आहे. हे मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजचे पदवीधर आहेत. यांना मराठी चांगलें येतें. ते बाबांचे भक्त आहेत. बाबांबद्दल त्यांना त्रोटक माहिती आहे. त्यांनीं मजकडून श्रीसाईसच्चरिताची एक प्रत विकत घेतली. मी त्यांना साईबाबा ऑफ शिरडी या पुस्तकाची एक प्रत, श्रीसाईबाबा पुण्यतिथि अख्यान व श्रीसाईदत्ताख्यान व आणखी कांहीं श्रीसाईलीलेचे अंक, त्यांची बाबावर असलेली भक्ति पाहून, नजर केले. ते व मी त्यांच्या दर्याकांठीं बांधलेल्या उद्धव निकेतन बंगल्यांत तीन तीन तास प्रमाणें दोन दिवस ( ता. १ व २ जुलै रोजीं ) याच संशोधन विषयावर बोलत बसलों होतों. मूळ द्वारकेचें संशोधनकार्य आमचें असता तुम्हीं या कार्याकरितां इकडे कसे आलां म्हणून साश्चर्य कुतुहल मुद्रेनें त्यांनीं मला विचारलें, व आमची मूळ द्वारका दक्षिणेंत घेऊन जाण्याचा तुमचा विचार आहे कीं काय अशीही एक खुबीदार, हंसत मुखानें विनोदपूर्ण पृच्छा केली. तसेंच दक्षिणेंत मूळ द्वारका असावी असें तुम्ही कोणत्या आधारावरून म्हणतां, असाहि त्यांनीं मला प्रश्न केला. बाबांचीं वचनें हा माझा आधार असें सांगून तीं वचनें मी त्यांच्यापुढें मांडिलीं. त्यांना अत्यंत कौतुक वाटलें व हें कोडें काय आहे याचें त्यांना आकलन होईना. नंतर मी परत खंबालियाला आलों.

खंबालियाला आल्यानंतर श्री. पथुभासाहेब मजकडे आले. मी त्यांना द्वारकेला घडलेली सर्व हकीकत सांगितली. त्यांनीं बडोदें येथील पुराण वस्तुसंशोधन खात्याचे डायरेक्टर श्री. हिरामंडशास्त्री यांनीं मूळ द्वारकेसंबंधी लिहिलेला व मुंबई क्रॉनिकलमध्यें नुकताच त्यावेळीं प्रसिद्ध झालेला त्यांचा एक लेख मला वाचावयास दिला, व तसेंच ता. ८–७–३५ रोजीं गुजराथींत लिहिलेला "श्री यदुवंशप्रकाश अने जामनगरनो इतिहास" सुमारें ७००–८०० पानांचा ग्रंथ वाचावयास दिला. तो मी काळजीपूर्वक व लक्षपूर्वक वाचला. त्यांत दिलेली माहिती ग्रंथकर्त्यानें ( श्री कवि भावदानजी भिमजीभाई रतनु, नवानगर–जामनगर संस्थानांतील कालावड ग्रामनिवासी ) श्री महाभारत, श्रीमद्भागवत व इतर ग्रंथांवरून घेतली आहे. या ग्रंथावरून हल्लींच्या संशोधन कार्याला माझ्या मतें उपयुक्त अशी माहिती मिळाली ती—

आर्य ज्योतिषाचे सिद्धांताप्रमाणें सृष्टीच्या उत्पत्तीस १९५५८८५०३१ वर्षें झालीं

त्यांत चार युगे २७ वेळां गेलीं व हल्लींचें १८ वें युग चालू आहे. (युगें अठाविस विटेवरी उभा वामांगें रखुमाई पुंडलीक शोभा वगैरे)

सत्ययुगाचीं वर्षें १७२८०००

त्रेतायुगाचीं वर्षें १२९६०००

द्वापारयुगाचीं वर्षें ८६४०००

कुलीयुगाचीं वर्षें ४३२०००

अठाविसाव्या सत्ययुगांत श्वेत वराह कल्पांत ब्रह्मदेवाच्या वर्षाच्या तिसऱ्या दिवशीं वैवस्वत मनूचा जन्म झाला.

वैवस्वत मनूच्या वंशांत सत्य युगांत ब्रह्मा, वैवस्वत मनु आदिकरून ५८ चक्रवर्ति राजे झाले.

त्रेतायुगांत दिलीप, रघु, अज आदिकरून ६० चक्रवर्ति राजे झाले.

त्रेतायुगाचे तिसरे चरणांत शेवटच्या सुरथ राजानंतर प्रजेंत कोणी राजा नव्हता. म्हणून पृथ्वीवर अवतार घेण्यास इंद्रानें चंद्रास आज्ञा केली. त्याप्रमाणें चंद्रानें पृथ्वीवर अवतार घेतला व तेव्हांपासून पृथ्वीवर चंद्रवंश सुरू झाला.

श्री. आदिनारायणापासून चौथी पिढी चंद्रराजाची, व चंद्रराजापासून ५६ वी किंवा ६० वी पिढी श्रीकृष्णपरमात्म्याची येते.

आतां श्रीकृष्णवंश म्हणजे यदुवंश किंवा यादव किंवा जाधव वंश.

सौराष्ट्रांत पूर्वी सार्वभौमसत्ता खालीं लिहिलेल्या वंशात होती.

१ यदुवंश—सत्ता सार्वभौम—राजधानी प्रयाग.

२ मौर्यवंश— ,, ,, उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत

पूर्वेस मगधापासून पश्चिमेस सौराष्ट्रापर्यंत या वंशांतील जगप्रसिद्ध राजा अशोक इसवीसनापूर्वी तिसऱ्या शतकांत होऊन गेला.

३ क्षत्रपवंश—सत्ता—कच्छ, सौराष्ट्र, गुजरात, माळवा.

४ गुप्तवंश—सत्ता—गंगा ब्रह्मपुत्रा यांच्यामधील प्रदेश व सौराष्ट्र.

५ वल्लभीवंश—या वंशांतील शेवटचा जगविख्यात राजा शिलादित्य. राजधानी खंडियारजवळ वल्लभीपूर.

५ चावडावंश—या वंशांतील महापराक्रमी राजा वनराज चावडा. राजधानी सौराष्ट्र देशांत श्रीसोमनाथाजवळ पाटणा, (पाटणा)

७ सोलंकीवंश—सत्ता सौराष्ट्रावर. या वंशांतील पराक्रमी राजा भीमदेव.

८ वाघेला वंश—सत्ता सौराष्ट्रावर. या वंशाच्या अमदानींत विसनगर व विजापूर हीं शहरें बांधलीं.

चंद्र राजाची वंशावळ—१ चंद्र, २ बुध, ३ पुरुरवा, ४ आयु, ५ नहुष ६ ययाती, ७ यदु.

यदुराजा सर्वांत फार पराक्रमी होत. म्हणून त्याच्या वंशांतील राजांना यदुवंशीय राजे म्हणतात. या वंशांतील ४१ वा राजा वृष्णी हा महापराक्रमी झाला. पुढें यदुवंशाला वृष्णीक किंवा वृष्णीय असें म्हणूं लागले. या वंशांतील ५४ वे राजे सुरसेन, ५५ वे वसुदेव व ५६वे श्रीकृष्ण याप्रमाणें या वंशांत राजे झाले.

श्रीकृष्ण हे विक्रमसंवत पूर्वी २५२५ वर्षांपूर्वी होऊन गेले. श्रीकृष्णांनीं करवीर क्षेत्रांत शृगाल राजाचा वध करून नंतर ते मथुरेला आले. तेथून ते गोकुळास गेले. जरासंधाचा जांवई कंस मेल्याची वार्ता ऐकतांच जरासंधानें मथुरेवर १७ हल्ले केले. पण त्या सर्वांत तो पराजित झाला. १८ वे हल्ल्याचे वेळीं जरासंधानें प्रचंड सैन्य जमा केलें व पुन्हा मथुरेवर हल्ला करण्यास आला. कालयवनानेंही प्रचंड सैन्य जमा करून तोही मथुरेवर याच वेळीं हल्ला करण्यास आला. ही खबर श्रीकृष्णाना कळतांच ते गोकूळ–वृंदावनाहून अक्रूर व बलिराम यांना बरोबर घेऊन मथुरेस आले. उग्रसेन हा त्यावेळीं मथुरेचा राजा होता. हा कंसाचा बाप व श्रीकृष्णाचा आजा ( आईचा बाप ); पण कंसानें त्याला कारागृहांत टाकलें होतें. त्या गादीवर आपण बसून श्रीकृष्णांनीं त्या हल्लयांत जरासंधाचा व कालयवनाचा पराभव करून उग्रसेनाला मथुरेच्या गादीवर बसवून आपण अनर्त देशांत पश्चिमसमुद्राकडे द्वारकापुरी निर्माण करून, मथुरेच्या गादींवरून निघून यादवासह द्वारकापुरींत राहिले. सर्व जगतांत अत्युत्तम अशी ही नगरी विश्वकर्म्याकडून त्यांनीं निर्माण करून घेतली. ( हरिवंश अध्याय ५६–५७–५८ )

अनर्त हा देश सौराष्ट्र देशाजवळ आहे, असें भिड यांच्या संस्कृत–इंग्लिश कोशांत दिलेल्या शेवटच्या पौराणिक काळाच्या "प्राचीन भारतम्" या नकाशांत दाखविलें आहे.

"सौराष्ट्र also called अनर्त modern Peninsula of the Kathiawar. द्वारका is called अनर्तनगरी or अब्धिनगरी. The old द्वारका stood near मधुपूर 95 miles south-east of द्वारका and also near mount रैवतक which appears to be the same as hill near Junagad."

Extract from appendix III on important Geographical names in the ancient India page 147 to the Late Prof. V. S. Apte's practical Sanskrit Dictionory.

दुसरे इतिहासकार असें म्हणतात कीं, कृष्णपरमात्मा शंखोद्धार बेटांत (बेट द्वारकेंत ) कांहीं काल राहिले व हल्लींच्या द्वारकेच्या बाजूला जी मूळ द्वारका समुद्रांत बुडविली, तेथेंच ही द्वारका त्यांनीं बनविली.

श्रीकृष्णांनीं द्वारकेच्या भोवतीं ९६ मैल लांबीचा कोट बांधला होता. ही द्वारका कोणत्या ठिकाणीं होती, याबद्दल अद्याप निश्चित एकमत नाहीं. कोणी इतिहासकार म्हणतात

कीं, ही द्वारकानगरी कोडियार व गिरनार यांच्याजवळ होती, व वेरावळ व पोरबंदर तिच्या वाड्या होत्या.

हीच सोन्याची व रत्नजडीत नक्षीच्या कामाची द्वारका होती. हिच्यांत श्रीकृष्णाचें मंदिर (निवासस्थान) निराळें स्वतंत्र होतें. हरिवंश अ. ५६–५७–५८ यांत वर्णन केलेल्या द्वारकेंत आणखी पुष्कळ फेरफार करून ही विशेष द्वारका बनविली असें हरिवंश अ. ९८–९९ यांत लिहिलें आहे.

जामनगर संस्थनांत दर्या किनाऱ्यावर जी हल्लीं बाळाचडी आहे त्या जागेवर द्वारकेंत मेलेलीं मुलें पुरीत असत. हल्लीं त्या ठिकाणीं बालश्राद्ध होत असतें. ह्या बाळाचडीच्या उत्तरेस समुद्रखाडी आहे. तेथें दरवर्षी अक्षय्य तृतीयेच्या दिवशीं मोठी भरती ओहोटी येते. त्यावेळीं त्या खाडींत मूळ द्वारकेचा खंडेरा (खाडा) आतां पण दृष्टीस पडतो. त्याचें दरवर्षी फक्त तीनच तास दर्शन होतें, असें तिकडील राहाणारे लोक सांगतात.

कित्येक जुन्या ग्रंथांत या द्वारकानगरीचा आठशें मैलांचा घेर होता व तींत १५–१६ लाखांची वस्ती होती असें वर्णिलें आहे. त्यावेळीं आर्यावर्तांत असलेल्या सर्व मोठ्य शहरांत ही द्वारका नगरी फारच मोठी व विस्तीर्ण होती.

कांहीं झालें तरी मूळ द्वारका हें नगर अवर्णनीय बांधकामाचें व अति मोठ्या विस्ताराचें होतें. यांत चव्हाटे, चौक, राजरस्ते, मोठमोठ्य गल्ल्या, बागबगीचे, उपवनें, पुष्पवटिका, बनवाटिका, गगनचुंबी मोठमोठाले महाल, सभास्थानें, हवेल्या, राजवाडे व असंख्य सुखसोई होत्या.

अपूर्ण

संशोधकः—श्री साईपदरज दासानुदास

**कै. वा. वि. देव**

बाबांचें बाळ.

---

# " साई--प्रभाव "

## १

श्री. संपादक महाशय श्री. साईलीला मासिक यांस स. न. वि. वि.

मी एक नंबरचा दारुड्या होतों. माझा सर्व पगारही मला पुरत नव्हता. मदिरा म्हणजे माझी बायको होती. तिच्यापायीं मीं घरच्या लक्ष्मीला विसरलों. त्या मदिरेनें मला अशी काय मोहिनी घातली होती कीं, संध्याकाळ झाली कीं माझे पाय नकळतच तिकडे

वळत, आणि यथेच्छ मदीरापान करीत असें. सकाळीं निश्चय करीत असे कीं, दारु सोडली ! पण कुठपर्यंत ? संध्याकाळपर्यंत ! ! त्या मदिरेपायीं मी कर्ज–बाजारीं झालों व सर्व भाऊबंध मला विचारीतनासे झाले. माझ्या वडिलबंधूना–गणपत त्यांचें नांव–माझी फार कळकळ होती. त्यांनीं मला एकदां कुर्ल्यास नेलें व दुसरें दिवशीं महाशिवरात्र होती. त्यामुळें मला रजा होती. कुर्ल्यास गेल्याबरोबर तेथील ती श्री साईबाबांची भव्य तसबीर पाहून मला भीति वाटली, पण मन शांत झालें. डॉ. गव्हाणकर यांना पाहिलें तर ते एक साधा सदरा व लेंगा नेसलेले होते. माझा समज फार निराळा होता. डॉक्टर ही व्यक्ति कफनी दाढी वगैरेंची असेल–पण त्यांनीं मला आदरानें सांगितलें कीं ‘ रघू उद्यां शिवरात्र आहे. आपण उद्यां ठाण्याला शंकराच्या देवळांत भांग पिण्यास जाऊं. तूं माझ्याबरोबर ये. ’ मनांत म्हणत होतों, दारु मिळेल तर बरी पण हे तर भांग सांगतात. मी कबूल केलें. नंतर ते एकदम रागानें म्हणाले कीं, “ त्या शंकराला ( श्री बाबांच्या फोटोला ) दारु अर्पण कर. रहा उभा आणि सांग ‘ आजपासून दारु तुम्हांला अर्पण केली ” दुसरे दिवशीं डॉक्टरांबरोबर ठाण्याच्या शंकराच्या देवळांत गेलों. शंकराच्या भव्य पिंडीचें दर्शन घेतलें. मनाला आनंद झाला व बाहेर आलो. तिथून गणपतीच्या देवळांत जाऊन गणपतीचें दर्शन घेतलें व उसाचा रस ( भांग ती हीच ) पिऊन परत कुर्ल्यास आलों. व श्रीसाईबाबांना नमस्कार केला. माझ्या मनांत एकदम असा प्रकाश पडला कीं, हीच मूर्ति माझ्या समोर जर सतत राहील तर मी त्या मदिरेच्या तडाक्यांतून सुटेन, आणि खरोखरच जादूच्या कांडीप्रमाणें माझ्यांत फरक पडला. आजच्या या शिवरात्रीस एक वर्ष झालें, मला कधींहि दारूची आठवण येत नाहीं. थोडीबहुत कर्जफेड झाली व श्रीसाईकृपेनें चांगल्या मार्गास लागलों.

आपला

( २ ) **रघुनाथ हरिबा शिर्के**

बुक बाइंडर, कलेक्टर ऑफीस, मुंबई.

मी कष्टम आफीसमध्यें शिपाई आहे. माझ्यावर एक मोटी आळ आली होती. परंतु मी निर्दोषी होतों. मी बाबांचा धांवा केला. माझ्या बायकोस घरींच माझ्यावर आलेलें संकट कळलें. ताबडतोब तिनें कुर्ल्यास मनुष्य पाठविला. डॉ. गव्हाणकरांनीं तीला असें सांगितलें कीं, श्रीसाईबाबाच्या तसबिरीसमोर तुपाचा दिवा लाव व त्यांची प्रार्थना करा. तुझा नवरा सुखरूपपणें घरीं येईल. आणि खरोखरीच तसें झालें. माझ्यावरील संकट टळले. चोरीस गेलेले पैसे मिळाले व आम्हीं दोघेजण–माझ्याबरोबर दुसरा एक शिपाई होता. निर्दोषि सुटलों.

**रावजी बाबाजी बावकर**

( ३ ) वरळी मुंबई १८

सद्‌गुरु वांचोनि सांपडेना सोय ॥
धरावे ते पाय आधीं त्यांचे ॥ १ ।

आपुल्या सारिखें करीति तात्काळ ॥
नाहीं काळवेळ तयालागीं ॥ २ ॥
लोह परीसाची न साहे उपमा ॥
सद्गुरु महिमा अगाधची ॥ ३ ॥
तुका म्हणे कैसे आंधळे हे जन ॥
गेले विसरोन खऱ्या देवा ॥ ४ ॥

साईसारखा सद्गुरु मिळणें फार कठीण, त्यांच्यावर खरोखरीनें श्रद्धा ठेविली तर ‘देव भावाचा भुकेला’ हें म्हणणें पटतें. मला तीन कन्या आहेत पण मुलगा होण्याचीं चिन्हें दिसेनात. पण श्रीसाईबाबांचा पिच्छा मात्र सोडला नाहीं. त्यांच्या सेवेंत—वेडी-वांकडी का होईना—अंतर पडूं दिलें नाहीं. त्यांच्याच कृपेनें मला पुत्ररत्न झालें व घरांत प्रकाश पडला.

आपला
**बाबूराव इंगळे**

---

# प्रासादिक अभंग—माला

## ॥ श्रीगणेश—साई ॥

अनाथाच्या नाथा । शिरडी साईनाथा ॥
शरण तुला मी । ठेवीं पदीं माथा ॥
गांजलों संसारीं । आशा नाहीं चित्ता ॥
विसंबूनि राही । तुझ्यावरी आतां ॥
तारणें मारणें । तुझ्या हातीं सर्व ॥
दास केशव । अर्पितसे सर्व ॥ १ ॥
जीवाचा संसार । तुझ्याविणा देवा ॥
नाहीं होणें जीवा । यावत्कालीं ॥
कामक्रोध मोह । जीवाचे सांगाती ॥
विस्तवाची महती । किती वानूं ॥
आशा एक तुझी । ‘साई’ मायबापा ॥
तारी तूं अनंता । केशवासी ॥ २ ॥
मी तुझें लेकरुं । सांगूं कोणा आतां ॥
संसाराच्या चिंता । कलीयुगीं ॥
अनंत अपराधी । आहे तुझा बाळ ॥
लोटूं नको आतां । दूर दूर ॥

कृपादृष्टीं ठेवा । तारी या केशवा ॥
मार्गें न जादा । तुजपाशीं ॥ ३ ॥
जीवीचा जिवलग । साई माझा देव ॥
हृदयींचा भाव । जाणतसे ॥
भाव तेथें देव । संत म्हणताती ॥
जीव शिव एक । भावापोटीं ॥
ठेविला हा भाव । साई चरणीं जीव ॥
द्यावा अनुभव । केशवासी ॥ ४ ॥
जीव शिव पक्षी । दिसताती भिन्न ॥
मायेचें वेष्टन । तरुं लागी ॥
माया रांड कपटी । भाळी अज्ञ जनां ॥
दुःखाच्या वेदना ॥ अंतःकाळी ॥
दूर सारा पैका । गांठीं पाडा पैका ॥
अल्ला मालीक ऐका । सदोदीत ॥
फुकाचा हो मंत्र । नको दुसरें तंत्र ॥
चालू ठेवा सत्र । नित्यनेमी ॥
जीव शिव पक्षी । दिसतील एक ॥
प्रभूचरणीं मात्र । लक्ष ठेवा ॥
जीव तोची शिव । नाहीं भिन्न भिन्न ॥
करा दृढमन । साईपाशीं ॥
साई तोचि ईश । नका सोडूं त्यास ॥
विनवी जनांस । केशव ॥ ५ ॥
त्रास देतीं पोरें । बाईल नीत्य रडे ॥
कर्मांचे हे धडे । दाखविती ॥
त्रासलों संसारा । नाहीं कुठें थारा ॥
शांतीचा आसरा । देऊळासी ॥
देव तो देऊळा । धरीं हृदयीं बाळा ।
कर्माच्या कपाळा । पाय देई ॥
कर्म करा नीट । करील तो धीट ॥
नका करूं वीट । संसाराचा ॥
आपुल्या कर्मानें । आपण मरतों ॥
दोष तो लावतो । दुसऱ्याला ॥
करी दृढ मन । विसरा मान पान ॥
प्रभू चरणीं मन । असूं द्यावें ॥
संसाराचें दुःख । सांगू नको कोणा ॥

विनवी तो जना । केशव ॥ ६ ॥
संसारीं दुःखाचे । डोंगर साजीरे ॥
अंगारे धुपारे । करीताती ॥
जोतिषी तपस्वी । लोकां भूलविती ॥
नादीं ते लाविती । भोळे जनां ॥
नाहीं ताळमेळ । कुणाचा कुणाला ॥
घात त्यानें केला । जनतेचा ॥
भाव एक ठेवा । सांईवरी आतां ॥
दुःखाचा दुखवटा । करी दूर ॥
नका लागूं नादी । जोतिष्याच्या आदीं ॥
नका विसरूं कधीं । साईनाथा ॥
शिरडीची माऊली । साई श्री साऊली ॥
पाजी ती तान्हीली । केशव म्हणे ॥ ७ ॥
लहान मुलाचे । कान टोंचताती ॥
नाक टोंचताती । मुलींचें ॥
नाक आणि कान । शोभेचें साधन ॥
विषयाचें वान । कलियुगीं ॥
विषयाचें सुख । कलीच्या ह्या घरीं ॥
खऱ्या आत्मसुखा । आंचवती ॥
इंद्रिय दमना । केल्या विना कलीं ॥
नाहीं खरी शांती । या देहीं ॥
टोंचतील कान । संत मोठेपणीं ॥
मंत्र उच्चारुनी । वेळोवेळां ॥
नमस्कारानेंच । नाक टोंचविलीं ॥
खूण ते पटाविली । अहंपणीं ॥
नका जाऊं मागें । विषयसुखा लागें ॥
आत्मसुखाचा । शोध करा ॥
आत्मसुख आहे । तुमच्याच हृदयीं ॥
नको जाऊं दारीं । विषयाच्या ॥
नाक आणि कान । तोंड आणि भान ॥
धरा साई चरण । म्हणे केशव ॥ ८ ॥
मन रंगलें दंगलें । साई चरणीं लीन झालें ॥
जिवीचा जिवलग सखा । तो हा शिरडीमाजीं देखा ॥
विश्वचैतन्याचा गाभा । भक्तांसाठीं तिष्ठत उभा ॥
राम मारुति म्हणती नाथ । साई आहे आदिनाथ ॥

शिष्य पुसे कोण पंथ । असुचा सर्वनाथ पंथ ॥
प्रेमळाला देतो मोद । नाहीं मानत भेदाभेद ॥
जाऊनिया त्याच्याकडे । सांगा आपुलें हो सांकडें ॥
शरण शरण शिरडीसाई । दास केशव तुझ्या पायीं ॥ ९ ॥
वायका पोरें भाऊ मित्र । घरांत माझें कलत्र ॥
थारा नाहीं शांती नाहीं । सौख्य नाहीं एकत्र ॥
कुठें जाऊं कुणा पुसूं । काय आहे हें सत्र ॥
मिळेल शांती नाहीं भ्रांती । कुठें आहे हो अन्यत्र ॥
जा, जा तुम्हीं साईपाशीं । मिळेल शांती सौख्य राशी ॥
जाऊं नका हो कुणापाशीं । आहे तो हो शिरडीशीं ॥
सोयरे धायरे भाऊ बहिणी । आहेत सारे पैश्यावाणी ॥
कोणी नाहीं कुणाचा कुणी । केशव म्हणे सांई धणी ॥ १० ॥
बोला जयश्री जयश्री राम । मना देई तो आराम ॥
मना बांधा त्याची लगाम । मुखानें घ्यावें सीताराम ॥
स्वार होऊनी शोधा अपुलें धाम । जवळी आपुल्या आत्माराम ॥
मीपणाचा खोटा धरी अभिमान । करूं नका हो जिविचें नुकसान ॥
अहंपणाचा करा पूर्णविराम । जवळीसांगे केशव तो भगवान ॥ ११ ॥

## १२

नयनमनोहर मूर्ति सुंदर वाचा सिद्ध तुझी । साईवाचा सिद्ध तुझी ॥
भक्त तुझे हे वाट पाहती, आशिर्वादाची ॥ १ ॥
संत शिरोमणी त्रिगुणात्मक तूं मूर्ति रामाची । बाबा मूर्ति रामाची ॥
उपेक्षती दास तुझे प्रभू नित्य आरामाची ॥ २ ॥
साधें सोपें नाम तुझें, परी कठीण म्हणायाला । देवा कठीण म्हणायाला ॥
कृपा करा महाराज आतां परि तें घेण्याला ॥ ३ ॥
भोळी भाळी भक्ति बाबा करितों तुझी सेवा । बाबा करितो तुझी सेवा ॥
मान्य करुनि घ्या आतां अमुची लघुसेवा ॥ ४ ॥
पतीत पावन अससी देवा समाधी शिरडीशीं । साई समाधी शिरडीशीं ॥
गरीबांचा वाली दयाळा धांवूनि तूं येशी ॥ ५ ॥
संसारीं विटलों आम्हां ध्यास एक तुझा । बाबा ध्यास एक तुझा ॥
प्रश्न तरीं सांई सखया अमुच्या अब्रूचा ॥ ६ ॥
जाऊं कुठें सगुणात्मक तूं हो । एक तुझा भरंवसा ॥ बाबा एक तुझा भरंवसा ॥
अंत नको पाहूं सखया पुरवी तूं आशा ॥ ७ ॥
याहो याहो घट्ट धरूंया बाबांचे चरण । धरूंया बाबांचे चरण ॥
केशव विनवी सर्व जनानां जाऊंया शरण ॥ ८ ॥

१३

आनंद झाला । आनंद झाला ॥ देव देहीं तो पाहिला ।
मग उरलें नाहीं मी तूं पण । द्वैत अद्वैताची खूण ॥ १ ॥
तत्व तें नामांत । राहूं देई मनांत ॥
ध्यास लागो त्याचा मना । मग जाई उणेपणा ॥ २ ॥
रिद्धी सिद्धी सहित आहे । गणेश–साई आदि पाहे ।
घोका घोका आदि नाम । केशव म्हणे हेंचि काम ॥

१४

कृपेवीण देवा । जगीं ना विसांवा ॥
संसारी यातना । सहवेना ॥
भाऊ मित्र दारा । व्यर्थ हा पसारा
कुठें ना आसरा । तुझ्यावीण ॥
मागें हेंचि आतां । कृपा साईनाथा ॥
तारीं या केशवा । मायबापा ॥

संपादक

---

# शिर्डी वृत्त–

## नोव्हेंबर सन १९४८

या महिन्यांत बाहेरगांवची बरीच भक्त मंडळीं श्रीसाई–समाधीचें दर्शन घेऊन गेली. अभिषेक, आर्चन, लघुरुद्र, पूजा, नैवेद्य, आरती व अन्नदान वगैरे धर्मकृत्यें नेहमीं-प्रमाणें झालीं. संस्थान गवई यांचीं कार्तिक शु॥ ११ व कार्तिक व॥ ११ आणि ज्ञानेश्वर पुण्यतिथीस अशीं तीन कीर्तनें झालीं.

नवल विशेषः—दिपवाळीनिमित्त दिपोत्सव, श्री समाधीस मंगलस्नान वगैरे विधी सालाबादप्रमाणें झाले. श्री लक्ष्मी पूजन संस्थान मॅनेजर श्री. खडकतकर यांचे हस्तें झालें. कार्तिक शुद्ध ११ स श्री पालखीची मिरवणूक, मंगलस्नान व कीर्तन असे कार्यक्रम होते.

श्री. चंद्रकांत खरे यांनीं संगीत भजनाची हजेरी श्रीपुढें दिली.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे. मध्यंतरीं दोन दिवस अतिवृष्टि झाली.

# डिसेंबर सन १९४८

चालू महिन्यांत श्रीसाईबाबाचे दर्शनास बाहेरगांवची बरीच भक्तमंडळी आली होती. अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, आरती, नैवेद्य व अन्नदान वगैरे नेहमीप्रमाणें झालें. नाताळचे सुटीमुळें या महिन्यांत गर्दी जास्त होती. बाहेरगांवचे कीर्तनकार श्री. काशिनाथबुवा नगरकर यांचीं दत्तजयंतीनिमित्त एक व एकूण तीन कीर्तनें झालीं. तसेंच श्रीनारायणबुवा टाकळीकर ( नाशिक ) यांचें एक कीर्तन झालें.

श्रीदत्तजयंतीचा उत्सव श्रींचे मंदिरांत साजरा झाला.

श्री. पिरोजबाई दस्तुर, मुंबई, श्री. मणिकराम राणे, सौ. सुमित्रा राणे, मुंबई यांनीं श्रींपुढें गायनाची हजेरी दिली.

श्री. सदाशिव श्रीधर कागलकर यांचें प्रवचन या महिन्यांत झालें.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

# जानेवारी सन १९४९

या महिन्यांत नेहमीप्रमाणें बाहेरगांवच्या भक्तांची श्रीचे दर्शनास आवक–जावक चालू होती. अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा–आरती, नैवेद्य व अन्नदान नेहमीप्रमाणें झालें. संस्थान गवई यांची एकादशीनिमित्त दोन कीर्तनें झालीं.

श्री. ल. श्री. बोडस, नाशिकरोड, श्री. द. द. कुळकर्णी, सोलापूर, श्री. पंडित जगन्नाथबुवा सुरतकर, श्री. द्वा. कु. जगताप, पुणतांबा, रामराव कोटेकर, पुणतांबा, श्री. रं. म. जोशी, पुणतांबा, श्रीताराबाई वेलापूरकर, बेलापूर रोड, श्री. वामन प्रेमगिरीकर या लोकांनीं या महिन्यांत श्रींचें पुढें गायनाचे कार्यक्रम केले.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

## –: विनंति :–

श्रीसाईलीलेचा वर्षारंभ जानेवारीपासून चालू होतो. या अंकाबरोबर ज्या वर्गणीदारांची वर्गणी संपली असेल त्यांनीं आपली वर्गणी त्वरित पाठवून द्यावी, नाहींतर पुढचा प्रसिद्ध होणारा अंक पाठविला जाणार नाहीं.

संपादक

# " तथास्तु "

जीवांच्या जिवलग्या ! जंजाळमय जगांत, जाणिवीचें जीवन जगव। मोहमायेच्या महालांत अंतरंगांनीं नटलेल्या नटीला न डगमगतां 'धीर सो गंभीर' वृत्ती ठेवून स्वानंदाचें लेणें लेवून एक एक पाऊल पुढें टाकत जा। निराशेच्या निशेंत निद्रा न घेतां, निर्गुण, निराकार, निरामय अशा ॐकाराच्या मंजुळ नादस्वरानें गुंगून पायरी पायरी वर चढत जा। मद मदिरा मैथुन यांच्या संगतीनें मन मानेल असा भटकत न राहतां, सत्कर्म सद्धर्म, व सत्संगतीनें मानस सोहंवराचें शिखर गांठ। आसुरी आघोरी अविद्येच्या आहारीं न जातां सात्विक, सगुण, सोप्या अशा राजस मार्गानें जाऊन जगांत अजरामर हो !

बा जीवा ! 'दिसतें तसें नसतें म्हणूनच जग फसतें'. लांडी, लबाडी, लांचलूच यांचा सुळसुळाट सगळीकडे पसरला आहे. खऱ्याची दुनिया नाहीं, सत्याला विचारीत नाहीं आणि धर्म ध्यानीं मनीं नाहीं. सर्वत्र अंधार झाला आहे. स्वतःच्या स्वयंज्योतीनें प्रकाश पाहून आपला राजस मार्ग चोखाळ व शांति, समाधान, सहिष्णुता अंगीं बाणून दुष्ट, दुराचारी, आणि दुर्गुणी यांचा सहवास न करितां, वैश्वदेव अतिथी यांचा सत्कार कर—

देवता–प्राण–अग्नि–वंचन। वैश्वदेवान्तीं अतिथिवर्जन ॥
करूनि करिती जे पिंडपोषण। महद्दूषण त्या अन्ना ॥

एकदां बलराम, कृष्ण व सुदाम हे गुरु सांदिपनी यांच्या आश्रमीं सेवा करीत असतां कृष्ण व बलराम यांना लांकडें आणण्याकरितां जंगलांत पाठविलें. गुरुपत्नीनें त्यांच्या पाठोपाठ सुदामाला चणे देऊन पाठविलें. व भूक लागली म्हणजे त्या दोघांना देऊन तूं खा व वर पाणी प्या. असें बजाविलें. पुढें रानांत—

कृष्ण म्हणालाः—दादा, तहान लागली रे

सुदामः—अरे कृष्णा, अनशा पोटीं पाणी पिऊं नये, थोडा वेळ माझ्या मांडीवर विसांवा घे.

परंतु चण्याची गोष्ट कांहीं नाहीं. कृष्णाचा डोळा लागलासें पाहून सुदामा चणें खाऊं लागला.

कृष्णः—दादा, काय हो खातां ? आवाज कसला करितां ?

सुदामः—कायरे खायला आहे येथें, दगड आणि माती. उलट थंडीनें दांतावर दांत आपटत आहे. विष्णु सहस्रनामसुद्धां मुखानें स्पष्ट म्हणतां येत नाहीं.

हें ऐकून,

कृष्णः—मलाहि असेंच स्वप्न पडलें कीं,

एकाची वस्तु दुजा खातां। कायरे खातोस ऐसें वदतां ॥
खाऊं काय माती तो म्हणतां।
वाणी तथास्तुता प्रगटली ॥

दादा, हें केवळ स्वप्नच आहे बरें ! आणि ह्याच तालांत मी तुला प्रश्न केला कीं, दादा काय खातोस.

ह्याचा परिणाम सुदामाला अठराविश्वे दारिद्य भोगणें भाग पडलें.

बा जीवा ! सावध हो. श्री साई–पुरुषोत्तम–श्रीकृष्णपरमात्मा–सर्व ठिकाणीं उभा आहे. एखादे वेळेस असेंच कांहींच्या कांहीं करशील आणि वाणी तथास्तु होईल, मग फजीतीला पारावार नाहीं.

—संपादक